**<u>तातडीचे/महत्वाचे</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८ क्रीडा विभाग
क्र.क्रीडा/११/कावि/ २५ /२०१९
दि. १६/०१/२०१९

विषय - **क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत क्रीडा विभागाच्या विविध क्रीडा सुविधांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करणेबाबत**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागा अंतर्गत असणा-या विविध क्रीडा सुविधांचा लाभ नागरिक घेत असतात. त्याकरीता वेळोवेळी सदर सुविधा सुस्थितीत राहणेकामी मनपाच्या विविध विभागांकडून सदर ठिकाणी कामे केली जातात. मनपाच्या City Transformation (शहर परिवर्तन) प्रकल्पा अंतर्गत याबाबतची माहिती मा.आयुक्तसो. यांना दरमहा सादर करावयाची आहे.

तरी सर्व क्रीडा पर्यवेक्षाकांनी माहे ऑक्टो.,नोव्हे., डिसेंबर २०१८ मध्ये तुम्हांस नेमून दिलेल्या क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत क्रीडा विभागाच्या विविध क्रीडा सुविधा सुस्थितीत राहणेकामी केलेल्या कार्यवाहीची माहिती तातडीने २ दिवसात क्रीडा विभागाकडे सादर करावी, तसेच यापुढे दरमहा सदर माहिती ५ तारखेपर्यंत क्रीडा विभागाकडे सादर करावी. तसेच कोणत्या सुविधांचा लाभ नागरिकांकडून घेतला जातो किंवा नाही याबाबतही माहिती देणेत यावी.

सहाय्यक आयुक्त (क्रीडा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति - संबंधित क्रीडा पर्यवेक्षक

प्रत - क्रीडा अधिकारी यांस माहितीकरीता.